जुलै २०११

# पतसंस्थेत एक डॉक्टर

**पतसंस्थेत एक डॉक्टर** हे आजच्या अग्रलेखाचे शिर्षक वाचुन प्रत्येकास विचार करावा लागणार आहे. सर्वसाधारणपणे ''डॉक्टर ''म्हणजे मनुष्यावरच्या आजारपणावर उपचार करणारी व्यक्ती किंवा जास्तीत जास्त एखाद्या विषयात नैपुण्य मिळविलेली अर्थात **डॉक्टरेट** याच्या पलीकडे सर्वसाधारणपणे ''डॉक्टर ''या पदवीची व्याप्ती होत नाही. परंतु **पतसंस्थेत एक डॉक्टर** हा अत्यंत महत्वाचा विषय मी आपल्यासमोर विस्तारपुर्वक मांडीत आहे.

काही वर्षांपुर्वी एखादी नागरी सहकारी पतसंस्था नोंदणी करतेवेळी ५०० सभासद व ५० हजार रूपये भाग भांडवल जमा केल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार पतसंस्था नोंदणीकृत होत होती. व अलीकडच्या काळात शासनाने मा. सहकार आयुक्तांच्या माध्यमातुन अनेकवेळा पतसंस्थांच्या नोंदणी संदर्भात अनेक अटी, शर्ती व बंधने टाकून पतसंस्था नोंदणी करणे अशक्यप्राय केले आहे. त्यामुळे अगोदर नोंदणीकृत असलेल्या पतसंस्था, प्रशासक व अवसायनात गेलेल्या पतसंस्था ह्यावर सहकारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे विशेष लक्ष केंद्रीत झाले आहे. हे सर्व होत असताना बँकांप्रमाणे पतसंस्थांना एन. पी. ए.., सी. डी. रेषो, लिक्वीडीटी सारखे नॉर्मसचे पालन करून बँकींग रेग्युलेशन ॲक्टप्रमाणेच पतसंस्था चालविणे क्रमपात्र झाले आहे. राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व नागरी सहकारी बँका यांच्या कामकाजाकडे एकत्रीतरित्या लक्ष दिले असता आपल्या लक्षात येईल की, बँकांमधील विश्वस्त म्हणून काम करणारे संचालक व त्यांची भुमिका ही अतिमहत्वाची व जबाबदारिची बाब होवून बसली आहे.

अनेक बँकांमध्ये संचालक सांगतील तसे अधिकारी काम करत असतात, अनेक बँकांमध्ये अधिकारी सांगतील तसे संचालक निर्णय घेतात व अनेक बँकांमध्ये काही प्रमुख संचालक / पदाधिकारी सांगतील तसे अधिकारी काम करतात ह्यामुळेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक सुध्दा अडचणीत आलेली आहे. राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी **केवळ ५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्डच्या नियमावलीनुसार सभासदांना लाभांष देता येतो.** राज्यातील अनेक नागरी सहकारी बँका ह्या काही अपवाद वगळता आर्थिक अडचणीच्या उंबरवठ्यावर मोठ्या प्रमाणात उभ्या आहेत.

ज्या बँकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चे लायसन्स आहे व ज्या बँका लायसन्स शिवाय चालू आहेत याबाबत सर्वसामान्य भागधारक व ठेवीदार यांना काहीही माहिती नाही. वर्तमानपत्रे, टी. व्ही चॅनेल्स हे सुध्दा या विषयी क्षणीक विषयावर उथळ भाष्य करून त्याला प्रसिध्दी देवून काही दिवसांनी तो ही विषय नजरेआड करतात. एवढी सुबत्ता व मोठा अधिकारी वर्ग असताना देखील **सहकारी बँकींग सेक्टर** मध्ये आर्थिक अस्थिरतेची चिन्हे मोठ्या प्रमाणात वाढू लागलेली आहेत. आणि ही बाब अत्यंत चिंताजनक असून अशा वेळी पतसंस्थांकडून फार मोठ्या प्रमाणात अपेक्षा करणे जरी व्यवहारीक नसले तरी पतसंस्था ह्या सहकारातील सेक्टर बिलकुल दुर्लक्षीत करता येणार नाही. राज्यात १८ हजाराच्यावर नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीकृत असून २५ हजार कोटी रूपयांच्यावर ठेवी या पतसंस्थांकडे जनतेने ठेवलेल्या आहेत. **पतसंस्थांनी वाटलेले कर्ज थकीत झाल्यानंतर सहकार कायदा अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत शासनाने केव्हाही थकीत रकमांच्या भरपाईची योजना किंवा मदत पतसंस्थांना दिली नाही.** त्यामुळे पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या व भागधारकांच्या रकमेतून केलेले

कर्जवाटप व त्याची वसुली कोणाच्याही मदतीशिवाय करणे, कार्यालयीन जागा व उच्चशिक्षीत कर्मचाऱ्यांचा अभाव असताना उपलब्ध परिस्थितीत पतसंस्थांचा हा आर्थिक डोलारा असाच डौलाने कायम फडकण्यासाठी **प्रत्येक पतसंस्थेमध्ये किमान एक हुशार व जाणकार माणूस मग तो पदाधिकारी किंवा संचालक किंवा कर्मचारी असो मात्र तो असणे आवश्यक आहे**, अशा माणसाला पतसंस्थेचा उपविधि, सहकार कायदा, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट व समाजाची नाडी पुर्णपणे माहित असणे आवश्यक आहे. समाजकारण व अर्थकारण याची १०० टक्के सांगड घालून ठेवीदारांचा पैसा सुरक्षीत ठेवण्याची किमया व कायद्याप्रमाणे सभासदांना जास्तीत जास्त लाभांष देण्याची व पतसंस्था लेखापरिक्षणात नेहमी वरच्या वर्गात ठेवण्याची किमया ह्या किमान गोष्टींत पारंगत असणे आवश्यक आहे. म्हणजेच पतसंस्थेच्या कुठल्याही समस्येवर मनुष्याच्या भाषेत आजारावर त्वरीत उपचार करणारा म्हणजेच उपाय करणारा म्हणजेच पतसंस्थेचा डॉक्टर असणे आवश्यक आहे. यासाठी खालील काही सुचना या अग्रलेखात करीत आहोत.

१. पतसंस्थेतील अशा डॉक्टरांचे शिक्षण शक्यतो किमान पदवीपर्यंत असावे.

२. शक्यतो असे डॉक्टर रिटायर्ड नसावेत.

३. असे डॉक्टर कमी वेळेत संपुर्ण कामकाज पुर्ण करणारी हातोटी असणारे असावेत.

४. अशा डॉक्टरांनी निपक्षपातीपणे व निस्पृहपणे काम करण्याची भुमिका स्विकारणे आवश्यक आहे.

५. अशा डॉक्टरांनी आपल्या पतसंस्थेसाठी काम करून इतरांना सुध्दा मार्गदर्शन करण्याची भुमिका स्विकारवायास पाहिजे.

ह्याप्रमाणे अनेक पतसंस्थांमध्ये असे डॉक्टर असतील असे मी मानत असून ज्यांच्याकडे हे निकष पाळले जात नसतील त्यांनी हे निकष पाळून पतसंस्थांमध्ये असे डॉक्टर तयार करून भविष्यातील सर्व आव्हाने पेलावीत व पतसंस्थांची ही चळवळ आणखी वरदायी ठरावीवी अशी अपेक्षा करतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**